# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक ०९.०९.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ०८/०९/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७० वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २८,१४८/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.०८/०९/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयात एकुण ०५ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन १२.०६ लिटर दारू व एक मोसा असा एकुण ९,७३०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि. ०८/०९/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे औंढा ना.०१,हटटा ०२ अशा एकुण ०३ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व एक मोबाईल व नगदी असा एकुण १३,३७०/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**चोरी** :—दिनांक ०८/०९/२०२२ रोजी फिर्यादी भगवान बळीराम गिरी रा.कवठा बु ता.सेनगाव जि.हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे सेनगाव येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.०७.०९.२२ रोजी चे २०:०० ते ०८.०९.२२ रोजी चे ०५:३० वा चे दरम्याण मौजे कवठा मु येथे जंगदंबा देवीचे मंदिरात अज्ञात चोरटयांनी १)देवीच्या अंगावरील अर्धा ग्रॅम वजनाचे सोन्याचे डोळे जु.वा.कि.२,५०० रू २) देवीचा मुकुट चांदीचा ४ तोळे कि.२००० रू ३) दानपेटीतील नगदी ११०० रू आसा एकुण ५,६६० रू मुद्देमाल चोरून नेला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात सेनगाव पोलीस तपास करित आहेत.